27 OCT 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बनारस हिंदू विद्यापीठात होणार अशोक बाचूळकर यांच्या साहित्यावर संशोधन

लोकमत न्यूज नेटवर्क



आजरा : प्रांतीय व भाषिक सलोखा जपण्याच्या आणि वृद्धिंगत करण्याच्या हेतूने आजरा महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रो. डॉ. अशोक बाचूळकर यांनी हिंदी - मराठीत लिहिलेल्या व भाषांतरीत केलेल्या साहित्यावर बनारस (काशी) हिंदू विद्यापीठात डॉ. अशोककुमार ज्योती यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन होणार आहे.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील हिंदीच्या प्राध्यापकांच्या साहित्यावर अशा प्रकारचे संशोधन पहिल्यांदाच होत आहे. आजरा तालुक्याला मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्यानंतर हा बहुमान अशोक बाचूळकर यांना मिळाला आहे.शिवाजी विद्यापीठाचे गोल्ड मेडलिस्ट असलेले बाचूळकर कागणी (ता. चंदगड) गावचे सुपुत्र आहेत. ते मागील २१ वर्षांपासून आजरा महाविद्यालयात हिंदी विषयाचे अध्यापन करीत आहेत. आजअखेर त्यांचे ४ समीक्षा ग्रंथ, २ कथासंग्रह, १४ भाषांतरीत कविता व कथासंग्रह, ६ संपादित ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. या त्यांच्या संपूर्ण साहित्यावर बनारस (काशी) हिंदू विद्यापीठात संशोधन होणार आहे. त्यांनी लिहिलेल्या 'नाटककार भीष्म सहानी' या समीक्षा पुस्तकाला २००६मध्ये भारत सरकारकडून १ लाखांचा पुरस्कार मिळाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2024
पुढारी

# डॉ. जगदीश सपकाळे यांचे निधन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागप्रमुख व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. जगदीश भागवत सपकाळे (वय ५५) यांचे शुक्रवारी निधन झाले. डॉ. सपकाळे हे काही दिवसांपासून आजारी असल्याने त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच त्यांचे निधन झाले. ते मूळचे जळगाव जिल्ह्यातील रहिवासी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2024
पुण्यनगरी

# विधी, सेवा प्राधिकरणाला विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट देऊन मध्यस्थी विषयावर चर्चासत्र केले. कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सुधीर एस. इंगळे, शिवाजी विद्यापीठाचे विधी अधिविभागप्रमुख विवेक धुपदाळे, ॲड. गुरुप्रसाद माळकर, कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे लेखापरीक्षक ॲड. प्रमोद दाभाडे उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला भेट दिली. (छाया : पांडुरंग पाटील)

डॉ. धुपदाळे यांच्या हस्ते जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सुधीर एस. इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. विधी सेवा प्राधिकरण कार्याची सविस्तर माहिती देऊन न्यायालयीन वाद तडजोड आणि आपापसांत मिटवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन यावेळी सुधीर इंगळे यांनी केले.

ॲड. गुरुप्रसाद माळकर यांनी वैकल्पिक वाद निवारणाबाबत, तसेच अशा प्रकरणांमध्ये मध्यस्थी करताना मध्यस्थाची भूमिका कशा पद्धतीने बजावली पाहिजे, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच सामान्य घटकापर्यंत विधी सेवेची माहिती कशा पद्धतीने पोहोचवता येईल, याबाबत माहिती सांगितली.

प्रास्ताविक प्रमोद दाभाडे यांनी केले. आभार डॉ. विवेक धुपदाळे यांनी मानले.

यावेळी प्रियंका जाधवर, ॲड. सुवर्णा शिवाजी कांबळे, ॲड. सागर कांबळे, ॲड. लक्ष्मी कांबळे, ॲड. दीपाली कमलाकर, ॲड. पृथ्वीराज चव्हाण, ॲड. स्वाती खाडे, ॲड. समीना मुल्ला, ॲड. सुचित्रा पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2024
पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेवा योजनेच्या सोहळ्यात प्रा. रेखा जरग यांना सन्मानित करताना मान्यवर.

# 'भारती'च्या रेखा जरग यांचा सन्मान

**कोल्हापूर :** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापिका आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागप्रमुख रेखा जरग यांना २०२२-२०२३ चा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी उत्तेजनार्थ प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या सेवा योजनेच्या सोहळ्यानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. चौगुले यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजित कदम, मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, तसेच भारती विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एस. एस. भाटिया आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.